CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. ११ जून २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २५२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२


## राज्यातील शाळांमध्ये १५ जूनपासून एक राज्य एक गणवेश लागू



**मुंबई** : केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. २०२४-२५ शैक्षणिक वर्षापासून मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

त्यासाठी सर्व शाळांमध्ये स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिलाई करुन एकसमान एक रंगाचे दोन गणवेश उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. एकसमान एक रंगाचा दर्जेदार गणवेश शासन स्तरावरुन उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासन निर्णयात नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांनी सोमवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी नियमित गणवेश धारण करणे आवश्यक राहील. तसेच स्काऊट व गाईड या विषयाचा गणवेश मंगळवार, गुरूवार व शनिवार या तीन दिवशी विद्यार्थ्यांनी सदर गणवेश परिधान करावा. स्काऊट व गाईड विषयाचा गणवेश असलेल्या दिवशी स्काऊट व गाईड विषयाच्या तासिका ठेवण्यात येणार आहेत. मोफत गणवेश योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या गणवेशाची शिलाई महिला आर्थिक विकास मंडळामार्फत करण्यात येत आहे.

# निवडणुका संपल्या, आता देशाकडे पहा

## मणिपूरला प्राधान्य देण्याचा मोहन भागवत यांचा सल्ला



**नागपूर** : निवडणुका संपल्या आहेत. त्यामुळे प्रकाशझोत आता राष्ट्र निर्माणाकडे हवा. आपले इशान्येकडील राज्य शांततेसाठी आपल्याकडे वर्षभर पहात आहे. त्याला प्राधान्य द्यायला पहिजे, असे प्रतिपादन सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात भागवत बोलत होते. ते म्हणाले, दहा वर्षापुर्वी मणीपूर शांत होते. तेथील बंदुकींची संस्कृती संपल्यासारखे वाटत होते. पण, अचानक हिंसाचार उफाळला. निवडणुकींच्या गदारोळातून बाहेर येऊन आता देशाला भेडसावणाऱ्या समस्यांवर विचार केला पाहिजे. निवडणुकींच्या प्रचारात केलेल्या आरोपांवरही सरसंघचालकांनी असूड ओढले. नवे सरकार बनले. त्याची अजून चर्चा सुरू आहे. दर पाच वर्षांनी घडणारी ही घटना आहे. देशाचे संचालन करणारी निवड महत्त्वाची आहे. का झाले? का, कसे याचे विश्लेषण संघ करत नाही. दरवर्षी मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचा आम्ही प्रयत्न करतो, तसा यंदाही केला, असे भागवत यांनी स्पष्ट केले.

**अहंकार नाही तोच सेवक** : वास्तविक सेवक म्हटले जाऊ शकते तो मर्यादेत वागतो. मर्यादेचे पालन करून कार्य केले पाहिजे. उपजिविकेचे काम केलेच पाहिजे. त्यात उत्कृष्टता असली पाहिजे. त्याप्रमाणे दुसऱ्याला धक्का लागू नये, ही मर्यादा सांभाळावी. ही मर्यादा हाच धर्म आहे. मर्यादा सांभाळली की अहंकार येत नाही, त्यालाच सेवक म्हणवून घेण्याचा अधिकार आहे.

**स्पर्धेतून एकत्र आलेल्यांत सहमती हवी** : दोन पक्ष असतील तर स्पर्धा असतेच त्यातही मर्यादा हवी. संसदेत जाऊन सहमतीने सेश चालवतील. सहमतीने चालण्याची आपली परंपरा आहे. १०० टक्के सहमती अशक्य आहे. प्रत्येकाचे मन वेगळे आहे. स्पर्धेतून एकत्र आलेल्यांमध्ये सहमती होणे आवश्यक आहे


**असा देश कसा चालेल** : प्रचारात दोन गटात विभाजन होईल, असा प्रचार झाला. विनाकारण संघाला मध्ये ओढले. तंत्रज्ञानाचा वापरून असत्य गोष्टी मांडल्या. विद्येचा असा वापर करत नाहीत. विद्येचा उपयोग प्रबोधनासाठी केला पहिजे. पण तंत्रज्ञानाचा वापर असत्यासाठी केला गेला. असा कसा देश चालेल? असा सवाल भागवत यांनी केला.

**विरोधी नव्हे प्रतीपक्ष** : विरोधी पक्ष नव्हे त्याला मी प्रतीपक्ष मानतो. त्यांच्याही मताचा विचार व्हावा. निवडणूक लढवण्यात मर्यादेचे पालन व्हावे. त्याचे पालन झाले नाही. देशापुढे अनेक समस्या आहेत. त्यावर एकत्र येऊन मार्ग काढावे लागतील, असे ते म्हणाले.

**प्रगती झाली पण आव्हाने कायम** : गेल्या दहा वर्षात अनेक चांगल्या गोष्टी घडल्या देशाची आर्थिक क्षेत्रात प्रगती केली. सामरिक स्थिती चांगली झाली. देशाची प्रतिष्ठा वाढली. कला, क्रीडा यांसह अनेक क्षेत्रात प्रगती केली. प्रगत देशांनीही आपल्या मानण्यास सुरू केले. मात्र म्हणून आपली आव्हाने संपली असे नव्हे. येणाऱ्या समस्यांचा विचार केला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली

**विकासाची दृष्टी अर्धवट** : बंगळुरात जलसंकट उभारले. हिमनद्या वितळण्याच्या बातम्या येत होत्या. पर्यावरणाचे संकट आहे जगभर आहे. संस्काराने आपण पर्यावरणालामित्र मानतो. नदी पर्वत पशुपक्षी यांचा विचार करतो. तेथेही हे संकट आहे. कारण विकासाची दृष्टी अर्धवट आहे. ती बदलावी लागेल. सर्वांना बदलावी लागेल. भारत कसे बदलतो हे पाहून जग आपली भूमिका बदलेल, असे ते म्हणाले.

# जुन्या दिग्गज मंत्र्यांची खाती कायम



**नवी दिल्ली** : नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मंगळवारी सायंकाळी घेतलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या महत्त्वाची बैठकीत खातेवाटपही केले. मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात नितीन गडकरी, अमित शाह, राजनाथ सिंह यांच्यासारख्या मोठ्या नेत्यांकडील जुनी खाती कायम ठेवण्यात आली आहेत. तर काही नव्या चेहऱ्यांकडे मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात अमित शाह गृहमंत्रालयाचा कारभार पाहतील. तर राजनाथ सिंह (संरक्षण), निर्मला सीतारामण (अर्थ), एस. जयशंकर (परराष्ट्र) आणि नितीन गडकरी यांच्याकडील रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्रालय कायम ठेवण्यात आलं आहे. तर नव्यानेच मंत्रिमंडळात समाविष्ट केलेल्या भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांना आरोग्य मंत्रालयाचा कारभार दिला आहे. तर शिवराज सिंह चौहान यांच्याकडे कृषीमंत्रिपद देण्यात आलं आहे.

### कॅबिनेट मंत्री

- नितीन गडकरी - रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री
- पीयूष गोयल - वाणिज्य आणि उद्योग मंत्री

### राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार)

- प्रतापराव जाधव - आयुष राज्यमंत्री आणि आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री आणि त्यांच्याकडील खाती
- रामदास आठवले - सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री.
- रक्षा खडसे - युवा कार्य आणि क्रीडा राज्यमंत्री
- मुरलीधर मोहोळ - सहकार राज्यमंत्री आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री

### कुणाला कुठलं मंत्रिपद? (कॅबिनेट)

- राजनाथ सिंह - संरक्षण मंत्री
- अमित शाह - गृहमंत्री; सहकार मंत्री
- नितीन गडकरी - रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री
- जगत प्रकाश नड्डा - आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री; रसायने आणि खते मंत्री
- शिवराज सिंह चौहान - कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री आणि ग्रामविकास मंत्री
- निर्मला सीतारामण - अर्थमंत्री, कॉर्पोरेट मंत्री
- डॉ. सुब्रह्मण्यम जयशंकर - परराष्ट्र व्यवहार मंत्री
- मनोहर लाल खट्टर - गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री आणि उर्जा मंत्री.
- एच. डी. कुमारस्वामी - अवजड उद्योग मंत्री आणि पोलाद मंत्री
- पीयूष गोयल - वाणिज्य आणि उद्योग मंत्री
- धर्मेंद्र प्रधान - शिक्षण मंत्री
- जीतन राम मांझी - सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्री
- ललन सिंह - पंचायत राज मंत्री आणि मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय मंत्री
- सर्वानंद सोनोवाल - बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री
- वीरेंद्र कुमार - सामाजिक न्याय मंत्री
- के. आर. नायडू - नागरी विमान वाहतूक मंत्री
- प्रल्हाद जोशी - ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री
- जुआल ओरम - आदिवासी व्यवहार मंत्री
- गिरीराज सिंह - वस्त्रोद्योग मंत्री
- अश्विनी वैष्णव - रेल्वेमंत्री, माहिती आणि प्रसारण मंत्री, आणि इलेक्ट्रॉनिक्स तथा माहिती तंत्रज्ञान मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया - दळणवळण मंत्री, ईशान्य क्षेत्राचे विकास मंत्री
- भूपेंद्र यादव - पर्यावरण, वन, हवामान बदल मंत्री
- गजेंद्रसिंह शेखावत - सांस्कृतिक कार्य मंत्री आणि पर्यटन मंत्री
- अन्नपूर्णा देवी - महिला आणि बाल विकास मंत्री
- किरेन रिजिजू - संसदीय कामकाज मंत्री, अल्पसंख्याक व्यवहार मंत्री
- हरदीप सिंग पुरी - पेट्रोलियम, नैसर्गिक वायू मंत्री
- मनसुख मांडविय - कामगार आणि रोजगार मंत्री आणि युवा कार्य तथा क्रीडा मंत्री
- जी. किशन रेड्डी - कोळसा मंत्री आणि खाण मंत्री
- चिराग पासवान - अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री
- सी. आर. पाटील - जलशक्ती मंत्री

# पंढरीच्या विठ्ठल मंदिरात पावसाच्या पाण्याची गळती

## संवर्धनाच्या कामाबाबत साशंकता; भाविकांतून नाराजी!

**पंढरपूर/प्रतिनिधी**







अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धनाचे पहिल्या टप्प्याचे काम सुरू असून मृग नक्षत्राच्या पावसाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील काही भागांमध्ये गळती लागल्याचे पहायला मिळाले. त्यामुळे जतन व संवर्धनाच्या कामाबाबत साशंकता निर्माण होऊन भाविकातून सदरच्या कामाबाबत नाराजी दिसत आहे.

दरम्यान याबाबत मंदिर समिती प्रशासनाकडून सदर प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेत लवकरच यावर उपाययोजना करून पाण्याची गळती थांबवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे सांगण्यात आले. श्री विठ्ठल मंदिराला सातशे वर्षांपूर्वीचे संत कालीन रूप आणण्यासाठी जतन व संवर्धनाचे काम गेल्या तीन महिन्यापासून सुरू आहे.

या कामादरम्यान रुक्मिणी मातेच्या सभामंडपाचे काम पूर्ण झाल्यानंतरही मृग नक्षत्राच्या दमदार पावसामुळे छतावरील स्लॅबमधून पावसाचे पाणी नव्याने केलेल्या कामांमध्ये येऊ लागल्याने या ठिकाणी गळती लागल्याचे दिसून येत आहे. तसेच मंदिराच्या इतर भागातही पावसाचे पाणी मंदिराच्या खांबाच्या जवळ झिरपत आहे.

विठ्ठल मंदिरातील रुक्मिणी मातेचा समोरील सभागृह नैवेद्य दरवाजा या ठिकाणी छतावरील पाणी नव्याने केलेल्या कामावरून झिरपत असल्याने या ठिकाणी गळती लागल्याचे दिसून येते तसेच मंदिराच्या दगडी खांबाजवळही अशाच पद्धतीने अनेक ठिकाणी पाणी झिरपत आहे. मंदिरात जतन व संवर्धनाचे पहिल्या टप्प्यातील काम उत्कृष्ट दर्जाचे असल्याची ग्वाही सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली होती. परंतु सलग तीन दिवसाच्या पावसा नंतर आज मंदिराच्या केलेल्या कामामधून पाणी झिरपत असल्याने वारकरी भाविकातून सदर कामाबाबत नाराजीचा सुर दिसून येऊ लागला आहे. तर काही भाविकांनी सुरू असलेल्या कामाच्या दर्जाबाबतही साशंकता व्यक्त केली.

> विठ्ठल मंदिर जतन व संवर्धनाचे काम जवळजवळ दीड वर्षे चालणार आहे. मंदिराच्या वरती वॉटरप्रूफिंग काम होणार आहे ते अद्याप बाकी आहे. पूर्वीचे छतावर जे होते ते काढण्यात आले आहे. त्या ठिकाणी ताडपत्री व प्लॅस्टिक बऱ्याच ठिकाणी झाकलेले आहे. परंतु तीन दिवसापासून पंढरपुरात अतिवृष्टी सदृश्य पाऊस पडत असल्याने आम्ही तेथे मंडप पत्रा शेड उभारलेले आहेत. पाऊस जास्त असल्याकारणाने काही भागात पाणी फक्त भिंतीवर झिरपलेले आहे. वॉटरप्रूफिंग चे काम केल्यानंतर मंदिर पूर्णपणे सुरक्षित असणार आहे. कोणत्याही प्रकारची गळती होणार नाही.
>
> **- राजेंद्र शेळके**, कार्यकारी अधिकारी

## वृद्ध महिलेचे ७५ हजाराचे दागिने पळविले

ग्रामीण CRIME

**बार्शी** : दर्शनासाठी गेलेल्या एका ७० वर्षीय वृद्ध महिलेचे पाया पडत एका भामट्याने त्यांच्या हातात उदबत्तीचा पुडा आणि पैसे ठेवून हातचलाखी करीत अंगावरील २५ ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला. ही घटना बार्शी येथील भवानी पेठेत असलेल्या जगदंबा देवस्थान जवळ रविवारी घडली.

बार्शी शहरपोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सुरेखा रणजीतसिंह परदेशी (वय ७० रा . भवानी पेठ ) यांनी फिर्याद दाखल केली. काल सकाळी ११ च्या सुमारात जगदंबा देवस्थान येथे दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी एक अनोळखी त्यांच्याजवळ येऊन त्यांच्या पाय पडले. त्याच्या हातातील प्लॅस्टिकच्या पिशवीतीत उदबत्तीचा पुडा, चार बिस्कीटचे पाकीट आणि ४०० रुपये रोख त्यांच्या समोर ठेवले. त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्या हातातील ३० ग्रॅम सोन्याची बांगडी आणि ५ ग्रॅम सोन्याची अंगठी असा एकूण २५ ग्रॅम सोन्याचे दागिने काढून घेऊन प्रसार झाला.

# पंतप्रधान मोदी यांची पीएम किसान फाईलवर स्वाक्षरी

## जिल्ह्यातील ४ लाख शेतकऱ्यांच्या पदरात पडणार दान



**सोलापूर/पुरुषोत्तम कुलकर्णी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी शपथ घेतल्यानंतर लागलीच देशातील शेतकऱ्यांसाठी एक महत्वपूर्व निर्णय घेतला. पदभार स्वीकारताच मोदी यांनी पीएम किसान योजनेच्या १७ व्या हप्त्याच्या फाईलवर स्वाक्षरी केली. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात लाभार्थी असलेल्या ४ लाख ९३ हजार ६७४ पेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या पदरात प्रत्येकी दोन हजार रूपयांचे दान पडणार आहे. खरीप हंगामाच्या काळात आर्थिक मदत मिळणार असल्याने बळीराजाच्या दृष्टीने दुधात साखर पडल्याने शेती क्षेत्रातून आनंद व्यक्त केला जात आहे.**

सोलापूर जिल्ह्यात पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी एकूण ६ लाख ६५ हजार शेतकरी अर्जदार असून त्यापैकी ४ लाख ९३ हजार ६७४ अधिक शेतकऱ्यांच्या खात्यावर पंतप्रधान किसान सन्मान निधींचा १७ वा हफ्ता जून अखेर जमा होणार असल्याचे सोलापूर जिल्हा कृषी अधीक्षक दत्तात्रय गवसाने यांनी सोमवारी सुराज्यशी बोलताना सांगितले.

केंद्र स्तरावर फेब्रुवारी २४ अखेर २० हजार कोटी वितरित केल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदींनी फेब्रुवारी २०१९ मध्ये किसान सन्मान योजना चालू केली. यामध्ये पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ३ महिन्याला दोन हजार प्रमाणे सहा हजार रुपये मोबाईल लिंक असलेल्या बँकेच्या खात्यात जमा केले जाते. या अगोदर १६ वा हफ्ता २८ फेब्रुवारी २४ रोजी जमा करण्यात आला आहे. काही कारणास्तव अडचणी असल्यास शेतकऱ्यांनी कृषी कार्यालयात समक्ष येऊन भेटावे, असेही आवाहनही त्यांनी केले. मोदी यांनी रविवारी शपथग्रहण केल्यानंतर रात्री उशीरा पीएमओ कार्यालयात जावून पदभार घेतला. त्यावेळी त्यांनी या योजनेच्या फाईलवर स्वाक्षरी केली. मोदींनी आपला पहिला-वहिला निर्णय देशातील शेतकऱ्यांसाठी घेतला. त्यानुसार कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात २० हजार कोटी रुपये जमा होणार आहेत. केंद्रात एनडीए सरकार स्थापन झाल्यानंतर सरकारचा शेतकऱ्यांसाठी हा पहिला निर्णय घेतला. दरम्यान, या निर्णयामुळे देशातील तब्बल ९.३ कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

(पान ८ वर)

### तालुकानिहाय पात्र लाभार्थी

| | |
|---|---|
| पंढरपूर | ८४,६०६ |
| माळशिरस | ७७,१७१ |
| सांगोला | ७६,९२३ |
| माढा | ७२,५१८ |
| करमाळा | ६६,९११ |
| बार्शी | ६५,००० |
| अक्कलकोट | ५४,८९९ |
| मंगळवेढा | ५४,९६७ |
| मोहोळ | ५२,४६४ |
| दक्षिण सोलापूर | ४०,६६५ |
| उत्तर सोलापूर | १९,०१८ |

### उत्तर सोलापूर-स्थैर्य देणारी योजना...

पीएम किसान योजना शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्रदान करते. पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत केंद्र सरकार शेतकऱ्यांना वार्षिक ६००० रुपये देते. या योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याच्या खात्यावर ३ वेळा प्रत्येकी २,००० रुपये पाठवले जातात.

### ही कामे करावी लागतील

हा हप्ता मिळण्यापूर्वी शेतकऱ्यांना काही महत्वाची कामे पूर्ण करावी लागतील. या कामासाठी फक्त ११ दिवस शेतकऱ्यांकडे उरले आहेत. २० जूनपर्यंत ईकेवायसी अपडेट करुन देण्यासह प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेण्यासाठीची प्रक्रिया या वेबसाइटवर सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी लवकरात लवकर ईकेवायसी करावी असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात १७ वा हप्ता मिळण्याची शक्यता आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




पाणीच पाणी चोहीकडे,
गेला रस्ता कुणीकडे ?

| कल्याण |
|---|
| 688-29-379 |

| मुंबई |
|---|
| 257-46-178 |

## रुपाली इंगळे यांचे निधन



**अक्कलकोट** : श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष महेश इंगळे यांच्या पत्नीरुपाली इंगळे(वय- ४८) यांचे सोमवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास दीर्घ आजाराने पुण्यातील जहांगीर रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पश्चात पती महेश इंगळे, मुलगा प्रथमेश इंगळे, सासू वत्सला इंगळे, भावजय अरूणा इंगळे असा परिवार आहे. अंत्ययात्रा मंगळवारी सकाळी ८ वाजता अक्कलकोट येथील मानकरी वाडा, धाकटीवेस येथील राहत्या घरापासून निघणार आहे.


सुराज्य सोलापूर

१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३

पाहिजेत

दैनिक सुराज्यसाठी खालील ठिकाणी **तालुका प्रतिनिधी** नेमणे आहेत.

- करमाळा
- माळशिरस
- माढा
- मंगळवेढा
- मोहोळ
- सांगोला

तालुका प्रतिनिधीसाठी किमान आवश्यकता :
तालुक्यातील राजकीय, सामाजिक परिस्थितीचा अभ्यास स्वतंत्रपणे लिखाण करण्याची क्षमता.
तालुक्याची भौगोलिक माहिती आवश्यक.
अनुभवी उमेदवारास आकर्षक वेतन + इन्सेन्टिव्हज्

खालील पत्त्यावर ८ दिवसांत अर्ज करावेत.
dailysurajyaoffice@gmail.com


CMYK